# निरुत्तर

सौ. कादंबरी देशमुख, सातारा
मोबा. 9405542455

परवा बऱ्याच दिवसांनी गंगुमावशींची गाठ पडली. नेहमी हसतमुख आनंदी दिसणाऱ्या गंगूमावशी खूपच नाराज आणि अगतिक वाटल्या. म्हणून मी विचारले, "मावशी तब्येत बरी आहे ना?"

"मला काय धाड भरलीया? पर बाई येऊ लागायची येळ आलीये बघा. माझी दोन-चार बाऱ्या तुमच्या घराकडे पावलं वळली व्हती माझी. पर म्हटलं आमचं रडगाणं तुमच्यापुढं गाऊन तुमचा सुखाचा जीव दुखात का म्हणून लोटा" "अहो मावशी, असं काय मला परक्यासारखं मानता? काय अडचण आहे सांगा पाहू आता! मला जेवढी शक्य आहे, तेवढी मदत मी करीन."

"बाई, तुमाला वाटतंय तशी अडचण पैशाची नाही. मागच्या दोन-तीन वर्सात कंदीच आली नाही पर गतवर्षीच्या म्हंजी 31 डिसेंबरच्या तारखेला वरीस हुईल, लई लई हाल केल्यात साऱ्या कुटुंबाचं दैवानं?

"म्हणजे? मी हबकुनच मावशींना नीट न्याहाळतच विचारले.

"आवं, देव देतो आन् दैव नेतं, असं झालंया आमच्या घरात!"

"असं कोड्यात बोलू नका. जे असेल ते मोकळेपणाने बोला. तुम्हाला हलके वाटेल." मी म्हणाले.

माझ्या कल्पनेपेक्षाही पलिकडचे गंगूमावशीने सांगितले. ते ऐकून खेड्यातही आणि समाजातील सर्व थरात 'नव वर्षाचे स्वागत' हा 'आनंदोत्सव' किती विकृत स्वरूपात चंगळवादाबरोबर सर्रास धुमाकूळ घालतोय याची माहिती मिळाली. चंगळवादाचे विकृत दर्शनच जणू!

कारण कष्ट करून हातावर पोट भरणारी गंगुमावशी आणि तिचा गरीब कष्टाळू निर्व्यसनी माळकरी नवरा, गावात शेतमजूरी करून जगत आहेत. कष्टाळू वृत्ती व प्रामाणिकपणा यामुळे त्या दोघांना कधी 'कामाचा' तुटवडा पडत नाही. मोठ्या कष्टाने आणि काटकसरीने करीत या आईबापांनी 'राजाला (मुलगा) गावातच बारावीपर्यंत शिकविले. एक छोटा कोर्सही करायला लावले. त्यामुळे राजा गावा-लगतच्या शहरातील एमआयडीसीत तीन वर्षे नोकरी करून कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देत होता. धाकट्या बहिणीला राजाने दहावीनंतर कॉलेजचे शिक्षण द्यायला सुरुवात केली होती. अंगभर कपडा आणि घरचं ताजं अन्न हे कुटुंब

समाधानानं, आनंदानं न्हात होतं. सारं कसं ठीक चाललं होतं.

पण गतवर्षीच्या ३१ डिसेंबरला राजू त्याच्या दोन मित्रांबरोबर एका 'टूव्हिलर' वरून 'तिघेजण' अशी थाटात गावाजवळच्या एका 'ढाब्यावर' गेले. तिथं खाणं आणि कधी नव्हे ते 'पिणं' हेही राजूने मित्रांच्या नादाने केले. घरी येतांना होऊ नये ते झालं. राजाला अपघातात अपंगत्व आलं. तीन वर्षांत मिळवलेले पैसे, घरातलं असेल नसेल ते ऑपरेशन, उपचार यातच गेले. वर 'दारू पिऊन एका टू व्हीलरवर 'तिघे' हे बेकायदेशीर कृत्य! म्हणजे गंगूमावशीच्या भाषेत, "घरचा खोळंबा आन् आब्रूचा खेळखंडोबा.'

राहून राहून गंगुमावशी मला विचारत होत्या, "बाई, ह्यो कसला 'नववरसांचं' स्वागत म्हणून! नवीन सण ३१ डिसेंबरला रातच्या बाराला साजरा करायचा म्हनं! आपला गुढीपाडवा पण नववर्साचा सण, म्हणून येरवाळी उठून सडा रांगोळी करून गुढी उभी करुन किती बी गरीबी असू दे, मुठीचं का होईना पुराण घालून देवाला पुरनावरनाचा निवद करतोच की! गतवर्षी बी राजा व पोरगी म्हणली, "इंग्रजी महिन्यापरमाणं ह्यो बी पाडवाच! म्हणून समदी करत्यात." मी बी घरात भजी, गरा, फोडणीचा भात, असं समदं गोडधोड अन् चमचमीत, सणाला करतु तसा सैपाक केला हुता. ते सुग्रास जेवान जेवायचं सोडून राजा का वं हाटेलात जेवायला गेला असल्या मैतरांबरुबर? ही कसली आनंद साजरा करण्याची पद्धत निगाली वं? नाचून, दारू पिवून कसं येणाऱ्या नव्या वरसाचं कसलं ह्ये स्वागत?

गंगुमावशी तोंडाने असे प्रश्न विचारीत होती. आणि तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वहात होत्या.

मी 'निरुत्तर' होऊन ऐकत होते.

हस्ताक्षर : सौ. नलिनी कापरे.

